**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.**

**माध्यमिक शिक्षण विभाग**

**"क्रिडा शिक्षक" व "ग्राऊंडमन" या पदासाठी एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूका करणेबाबत**

---

जाहिरात क्र. ९०/२०१३ दिनांक:२६/०७/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागामध्ये खाली नमुद केलेप्रमाणे **"क्रिडा शिक्षक" व "ग्राऊंडमन"** या पदावर तात्पुरती व्यवस्था म्हणून सहा महिने कालावधीसाठी एकत्रित मानधनावर करारपद्धतीने नेमणुका करणेबाबत मनपाच्या वतीने खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | पदाची संख्या | एकत्रित मानधन | इतर तपशिल अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १ | क्रीडा प्रबोधिनी विद्यालयासाठी विविध क्रीडा प्रकारासाठी तज्ञ शिक्षक<br>१. कबड्डी<br>२. खोखो<br>३. ॲथलॅटिक्स<br>४. कुस्ती<br>५. योगा | प्रशिक्षित पदवीधर बी.पी.एड. एन.आय.एस. | ०५ | १५,०००/- | १. एन.आय.एस. (डिप्लोमा) किंवा शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त किंवा आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार केलेला असावा.<br>२. राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडूंना किमान पाच वर्षे मार्गदर्शन केलेले असावे.<br>३. कोणत्याही महानगरपालिका येथील क्रीडा मार्गदर्शक पदाचा पाच वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| २ | क्रीडा प्रबोधिनी विद्यालयासाठी ग्राउंडमन | १२ वी उत्तीर्ण, विद्यापीठ खेळाडू असणे आवश्यक आहे. | ०१ | ७,५००/- | १. गाऊंडमन पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य<br>२. कोणत्याही महानगरपालिका येथील ग्राऊंडमन कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य<br>३. कोणत्याही एका मैदानी खेळात प्राविण्य असल्यास प्राधान्य |

१) ज्या पदाकरीता अर्ज केलेला आहे त्या पदाचे नाव पाकीटावर ठळक अक्षरात लिहावे.

२) अर्ज करणा-या उमेदवारांनी जाहिरातीचे दिनांकास ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाची शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

३) सदर पदे ही करारपद्धतीने एकत्रित मानधनावर भरावयाची आहेत.

४) सदर पदावरील नेमणूका या सहा महिने कालावधीसाठी हंगामी स्वरुपात करार पद्धतीने करावयाच्या असल्याने नियुक्तीच्या वेळी उमेदवाराने याबाबत रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड केलेला करारनामा द्यावा लागेल. या नेमणूकीच्या अनुषंगाने अर्जदारास या पदावर कायम स्वरुपी नेमणुकीचा हक्क सांगता येणार नाही.

५) मानधनावर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांचे कामकाजाचे कार्यक्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसर राहिल.

६) ज्या दिवशी महानगरपालिकेस सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीसी शिवाय उमेदवाराची मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

७) मुळ ६ महिन्याच्या नियुक्तीनंतर पुढील कालावधीचे मुदतवाढीसाठी उमेदवारास कोणताही हक्क सांगता येणार नाही.

८) मुलाखतीस येण्याकरीता उमेदवारांस कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

९) पात्र व निवड झालेल्या उमेदवारास नमुद प्रमाणे एकत्रित मानधना व्यतिरिक्त इतर सोयी सुविधा हक्क व आर्थिक लाभ देय राहणार नाहीत.

१०) उमेदवाराने आपल्या अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, गुणपत्रक, प्रमाणपत्र व अनुभव इत्यादी कागदपत्राच्या सत्यप्रती राजपत्रित अधिकारी यांचेकडून प्रमाणित करून जोडणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराकडे विशेष प्राविण्य असल्यास त्याबाबतही वेगळा तपशिला सादर करावा.

११) उमेदवारांनी सोबत दिलेल्या विहित नमुन्यात पासपोर्ट आकाराच्या फोटोसहित अर्ज करावा.

१२) माध्यमिक शिक्षण विभागातील पदासाठी अर्ज मा.शिक्षणाधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८. या नावाने करावा. सदरचा अर्ज **दिनांक १२/०८/२०१३ रोजी सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत वरील पत्त्यावर रजिस्टर पोष्टाने पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

१३) पात्र उमेदवारांची यादी दिनांक १६/०८/२०१३ रोजी दुपारी ५.०० वाजता महापालिकेच्या **www.pcmcindia.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध केली जाईल. अर्हता प्राप्त उमेदवारांच्या मुलाखती दिनांक १९/०८/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. अतिरिक्त आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ येथे घेण्यात येतील. यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

मुदतीनंतर प्राप्त  झालेल्या अर्जाचा विचार कोणत्याही परिस्थितीत करण्यात येणार नाही. पोस्टाने पाठविलेले अर्ज गहाळ झाल्यास अथवा विलंबाने प्राप्त झाल्यास त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही. विहित नमुन्यात नसलेले अर्ज, कागदपत्र अपूर्ण असलेले, वेळेत प्राप्त न झालेल्या अर्जाचा विचार करणेत येणार नाही. सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना महापालिकेच्या **www.pcmcindia.gov.in** या संकेतस्थळावर पाहता / **download** करुन घेता येईल. निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

सही/-
(श्रीकर परदेशी)
**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११ ०१८.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.
माध्यमिक शिक्षण विभाग
क्रमांक:माध्य।शि।१।कावि।१३८१।१३
दिनांक : २६।०७।२०१३

सही/-
**प्र. शिक्षणाधिकारी**
**माध्यमिक शिक्षण विभाग**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८.**

## उमेदवाराने करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति,

मा.--------------

-----------------

------------------.

**विषय:- एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूकीबाबत.**

संदर्भ - दिनांक / /२०१३ रोजीच्या ---------------- या वर्तमानपत्रामध्ये तसेच महानगरपालिकेच्या website वर प्रसिद्ध झालेली जाहिरात क्रमांक - /२०१३

महोदय,

संदर्भीय जाहिरातीनुसार मी एकत्रित मानधन पद्धतीने ----------------- या पदासाठी आवश्यकत ती शैक्षणिक अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरिता विहित नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

| | | अडनाव | स्वत:चे नाव | वडील/पतीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १) | संपूर्ण नाव | ----------------- | --------------- | ---------------- |

२) पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोडसह :- -------------------------------------

------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------

३) जन्मतारीख -

४) लिंग - स्त्री / पुरुष

५) जात -

६) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

७) अनुभव - -----------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

वर नमुद केलेला तपशिल खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे मानधनावरील नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहीन, तसेच माझ्याविरुद्ध कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण -

दिनांक - अर्जदाराची सही व नाव